| | |
|---|---|
| MHSN060025302023 | R.C.S./302/2023<br>Mumtaj Ajij Inamdar Vs. Aapaso Babu Kalawant |

## <u>निशाणी २० वरील आदेश</u>

**०१.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी कैफियत मुदतीत न दिल्याने त्यांच्याविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करुन कैफियत अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादीचे कथनानुसार, प्रकरणात प्रतिवादीस दावेचे समन्स दि. १०.११.२०२३ रोजी मिळाले. त्यानंतर ९० दिवसांचे आत कैफियत दाखल करणे आवश्यक होते. तथापी आवश्यक कागदपत्रे वेळेत न मिळालेने, मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. यात प्रतिवादीने कोणतीही जाणीवपूर्वक कसूर केली नाही. सबब प्रतिवादीने झालेला विलंब माफ होऊन कैफियत अभिलेखावर घ्यावी, अशी विनंती केली आहे.

**०३.** वादीतर्फे विधीज्ञांनी प्रस्तुतच्या अर्जास त्यांचे म्हणणे दाखल करुन आक्षेप घेतला आहे. त्यांचे पुढे कथन आहे की, सदरचा अर्ज व त्यातील कथने मान्य व कबूल नाहीत. वादी त्याचा स्पष्टपणे इन्कार करतात. प्रतिवादीने विलंबाचे कोणतेही ठोस कारण अथवा कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. सबब सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**०४.** प्रतिवादीचा अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. प्रतिवादीतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०५.** प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द सरसनिरस मानाने वाटप होऊन स्वतंत्र कब्जा मिळणेसाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांच्या अर्जात नमूद केलेल्या कारणांमध्ये प्राथमिक स्तरावर तथ्य असल्याचे दिसून येते. तसेच सदरचा अर्ज मंजूर केलेस वादीचे नूकसान होणार नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन व दोन्ही पक्षकारांचे हित लक्षात घेवून सदरचा अर्ज मंजूर होणे योग्य होणार आहे. त्यामुळे दोन्ही पक्षकारांमधील असलेला वाद संपुष्टात आणणेसाठी व न्यायदानासाठी मदत होईल. तसेच यामुळे दाव्यांची संख्या मर्यादित राहून वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असणारे मुद्दे एकत्रात निकाली करणे सोपे होईल.

**०६.** दाव्याचे स्वरुप व अर्जात नमुद केलेली हकीकत लक्षात घेता माझ्या मते, दाव्याचा गुणदोषावर अंतिम निर्णय होणेसाठी प्रस्तुत प्रतिवादीचा अर्ज मंजूर करुन त्यांच्याविरुध्द विनाकैफियत झालेला आदेश रद्द करुन कैफियत व म्हणणे दाखल करण्यास परवानगी देणे उचित होईल. मात्र प्रतिवादी यांनी कैफियत अभिलेखावर दाखल करण्यास केलेला विलंब दुर्लक्षित करता येणार नाही. त्याकरीता प्रतिवादीवर दंड लावणे अभिप्रेत आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. प्रतिवादी यांच्याविरुध्द विना कैफियत झालेला आदेश रद्द करणेत येत असून झालेला विलंब माफ करणेत येतो.
३. प्रतिवादी यांनी दाखल केलेली लेखी कैफियत अभिलेखावर घेणेस दंडाची रक्कम रुपये २००/– वादीस देण्याचे अटीवर परवानगी देण्यात येते.
४. उभयंतांनी नोंद घ्यावी.

RANJANA VIJAY KAMBLE
Digitally signed by RANJANA VIJAY KAMBLE
Date: 2024.08.22 17:27:41 +0530

ठिकाण –मिरज. (श्रीमती आर. व्ही. कांबळे)
दिनांक –२२.०८.२०२४. २ रे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर, मिरज.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. S. S. Shingana | | |
| Name of Court | :- | 2nd Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Miraj, Dist., Sangli. | | |
| Date of decision / typed | :- | 22 | 08 | 2024 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 22 | 08 | 2024 |
| Judgment/order uploaded on | :- | 22 | 08 | 2024 |